पोलीस स्टेशन माजलगाव (शहर)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** माजलगांव शहर **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0249 **Date and Time of FIR (प्र ख. दिनांक आणि वेळ):** 31/07/2020 23:27 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 31/07/2020

**Date To ( दिनांक पर्यंत):** 31/07/2020

**Time From (वेळेपासून):** 13:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 31/07/2020 **Time (वेळ):** 23:08 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 037 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/07/2020 23:08 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. (a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिश. व अंतर):** पश्चिम, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** बाजार रोड ,माजलगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** भागवत नारायण सुरवसे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1994 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदात्रा कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रामहातपुरी तामाजलग,माजलगांव शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | वर्तमान पता | महातपुरी ,माजलगाव ,माजलगांव शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 3 | स्थायी पता | महातपुरी ,माजलगाव ,माजलगांव शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9665490644

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल भिमराव जाधव | | | 1. तलाठी सजा पुरुषोत्तमप, माजलगाव ,माजलगांव शहर,बीड, महाराष्ट्र,भारत |
| 2 | शिवाजी रामकिसन धरपडे | | | 1. राकालिकानगर माजलगाव,माजलगांव शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 8 नोटा | 4,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 4,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादं

दिनांक :- 31/07/2020. अ◌ॅसीबी कार्यालय,बीड.मी भागवत नारायण

सुरवसे, वय 26 वर्षे, धंदा- शेती रा. महातपुरी ता. माजलगाव जि.बीड. मो.नं.9665490644.मी दि.23/07/2020 रोजी अ◌ॅसीबी कार्यालय, बीड येथे श्री.परदेशी, पोलीस निरीक्षक, अ◌ॅसीबी, बीड यांचेसमक्ष तक्रार दिली होती की, मौजे सुलतानपुर येथील गट क्र.233 मधील माझे व माझा भाऊ विठ्ठल नारायण सुरवसे यांचे नावे असलेली जमिनीची 7/12 व 8 अ उतान्यावर स्वतंत्र नोंद करण्यासाठी पुरुषोत्तमपुरी सजाचे तलाठी जाधव व खा.ई. धरपडे हे 5,000/-रुपयांची मागणी करत आहेत. तरी तलाठी जाधव व खा.इ. धरपडे यांचेवर कायदेशीर कारवाई करावी, वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.मी दिलेल्या तक्रारीवरुन दि.23/07/2020 रोजी पोलीस निरीक्षक श्री.परदेशी यांनी तलाठी जाधव व खा.ई. धरपडे हे माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे याबाबत माजलगाव येथील धरपडे यांचे झेरक्स दुकान येथे मला व पंच क्र.1 जोगदंड यांना पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सदर लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने मला व पंचाना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मला व पंच क्र.1 यांना तलाठी जाधव व धरपडे यांचेकडे पाठवले असता तलाठी जाधव व खा.ई. धरपडे हे तहसील कार्यालय माजलगाव येथे असल्याने मी व पंच क्र.1 असे तलाठी जाधव व धरपडे यांना भेटण्यासाठी तहसील कार्यालय माजलगाव येथे जाऊन तलाठी जाधव व खा.ई. धरपडे यांची भेट घेतली असता तलाठी जाधव व खा.ई. धरपडे यांनी माझ्याकडे 7/12 व 8 अ उता-यावर स्वतंत्र नोंद करण्यासाठी 5,000/-रु. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 4,000/- रु लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले. तसा दि.23/07/2020 रोजीचे लाचमागणी पडताळणीचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे. त्यानंतर तलाठी जाधव व खा.ई.धरपडे यांचेविरुध्द लाच रक्कम उपलब्ध झाल्यानंतर सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे ठरले. त्यावरुन आज दि.31/07/2020 रोजी माजलगाव येथे सुरक्षितस्थळी दोन शासकीय पंचांसमक्ष श्री.परदेशी यांनी मला व दोन्ही पंचांना अँथ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लम्प यांचा उपयोग व गुणधर्म सांगुन त्याचे प्रात्यक्षीक दाखवुन मी हजर केलेल्या 4,000/-रु.लाच रकमेस अँथ्रासीन पावडर लावली व सदरची लाच रक्कम ही माझे पॅटचे समोरील उजवे खिशात ठेवली. मला लाच स्वीकृतीनंतर करावयाचा ईशारा नेमुन दिला. वगैरे बाबींचा सापळापुर्व कारवाईचा पंचनामा

करण्यात आला.सापळापुर्व कारवाईचा पंचनामा पुर्ण झाल्यानंतर मला व दोन्ही पंचांना व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर व्हईस रेकर्डर चालु करुन माझ्याकडे देऊन मला व पंच क्र.1 यांना तलाठी जाधव व खा.ई. धरपडे यांना लाच रक्कम देण्यासाठी माजलगाव येथील धरपडे यांचे झेरक्सचे दुकानावर रवाना करण्यात आले. आमचे पाठोपाठ सापळा पथक व पंच क्र.2 हे येत होते. मी व पंच क्र.1 असे दोघेही धरप्रडे यांचे दुकानावर गेल्यावर तेथे माझे व तलाठी जाधव व धरपडे यांचेत चर्चा झाली. त्यादरम्यान तलाठी जाधव यांनी माझेकडे पैशाबाबत इशारा करुन खा.ई. धरपडे यांचेकडे देण्यास सांगितले. त्यावर मी माझे उजवे हाताने पॅंटचे समोरील उजवे खिशातुन लाच रक्कम 4,000/- रुपये धरपडे यांना दिले असता धरपडे यांनी सदरची लाच रक्कम 4,000/-रु. ही उजवे हाताने स्वीकारुन त्यांनी परिधान केलेल्या पॅंटच्या समोरच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर मी मला लाच स्विकारल्या बाबतचा नेमुन दिलेला पुर्व नियोजीत इशारा केला. इशारा प्राप्त होताच श्री.परदेशी हे पंच क्र.2 व त्यांचे स्टाफसह आमचेजवळ आले. माझ्याकडील व्हईस रेकर्डर बंद केला. तेव्हा श्री. परदेशी यांनी जाधव व धरपडे यांना त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर श्री.परदेशी यांनी पंच क्र.1 यांना पंच क्र.2 यांचेसमक्ष विचारणा केली की मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्र.1 यांनी सांगितले की, तक्रारदार यांना तलाठी जाधव यांनी पैशाची मागणी करुन धरपडे यांचेकडे देण्यास सांगितले त्यावर धरपडे यांनी 4,000/-रु. लाच रक्कम स्वीकारली आहे, असा खुलासा पंच क्र.1 यांनी केला. त्यानंतर श्री.परदेशी यांनी धरपडे यांना लाच रक्कमबाबत विचारले असता धरपडे यांनी सदरची लाच रक्कम ही त्यांचे पॅंटचे समोरील उजवे बाजुच्या खिशात ठेवल्यांचे सं ागितले. त्यानतंर श्री.परदेशी यांनी जाधव यांना त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारता त्यांनी अनिल भिमराव जाधव, वय 50 वर्ष, तलाठी सजा पुरुषोत्तमपुरी ता.माजलगाव जि.बीड. रा. मजरंथ कलनी, माजलगाव असे सांगितले..त्यानंतर धरपडे यांना पुर्ण नाव पत्ता विचारता त्यांनी शिवाजी रामकिसन धरपडे, वय 33 वर्ष, धंदा झेरक्स सेंटर चालक, रा. कालिका नगर, माजलगाव असे सांगितले. त्यानंतर धरपडे कडील 4,000/- रुपये पंचासमक्ष ताब्यात घेतले. त्यानंतर आपण घटनास्थळावर प्राथमीक कारवाई करुन तलाठी जाधव व धरपडे यांना घेऊन पुढील कारवाई कामी लाचुलपचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड येथे घेऊन आलात.तरी तलाठी जाधव व खा.ई. धरपडे यांनी माझ्याकडे माझे व माझा भावाचे नावे 7/12 व 8 अ वर स्वतंत्र नोंद करण्यासाठी दि. 23/07/2020 रोजी 5,000/-रु. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 4,000/- रु लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य करुन आज दि. 31/07/2020 रोजी स्वत: शासकीय पंचांसमक्ष लाच रक्कम 4000/- रुपये स्वीकारली असता लोकसेवक जाधव व खा.ई. धरपडे यांना लाचेच्या रकमेसह 13.05 वा. रंगेहात पकडले आहे. लाच रक्कम 4,000/-रु. पंचांसमक्ष खा.इ.धरपडे यांचेकडुन जप्त करण्यात आलेली आहे. तरी माझी अनिल भिमराव जाधव, वय 50 वर्ष, तलाठी सजा पुरुषोत्तमपुरी ता.माजलगाव जि.बीड. व खाजगी ईसम शिवाजी रामकिसन धरपडे वय 33 वर्षे रा. कालिका नगर, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड यांचेविरुध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे. समक्ष ( रविंद्र परदेशी ) पोलीस निरीक्षकलाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): avinash ashok rathod

**Rank** (पद): SI (Sub-Inspector)

**No.**(क्र.): DGPAARM8803 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्यांचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): SURESH SAVLERAM BUDHVAN

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI

पोलीस ठाणे अंमलदार
माजलगाव (श.) पोलीस स्टेशन.